# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील ऊसतोड वाहतूक कामगारांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शिफारशींची अंमलबजावणी करणेबाबत

**(१) ४६६८ (१४-१२-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालयाने माहे एप्रिल, २०२५ मध्ये ऊसतोड वाहतूक कामगारांच्या समस्यांच्या निराकरण करण्यासाठी २७ महत्त्वाच्या शिफारशी केल्या असून माहे ऑक्टोबर, २०२५ पासून त्यांची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने या शिफारशी लागू करण्यासाठी एक राज्यस्तरीय समिती गठीत केलेली असून सर्व प्रमुख जिल्ह्यांमध्येही अशा समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, आजमितिपर्यंत मा.उच्च न्यायालयाने केलेल्या कोणकोणत्या शिफारशींची अंमलबजावणी शासनाने केली आहे तसेच उर्वरित शिफारशींची अंमलबजावणी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (१७-०६-२०२६) :** (१) व (२) राज्यातील ऊसतोड वाहतूक कामगारांच्या समस्यांबाबत असलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करणेबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील सु मोटो जनहित याचिका क्र.०१/२०२३ मधील निर्देशानुसार ऊसतोड कामगारांच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी ऊसतोड मजुरांच्या समस्यांबाबत ॲमिकस क्युरी (Amicus Curiae) यांनी सूचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने ऊसतोड हंगामात कामगारांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत, दिनांक २८/०४/२०२५ रोजीच्या शासननिर्णयान्वये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये जिल्हाधिकारी उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी कामकाज पाहत असून जिल्हास्तरावर नियोजित कामांचा आढावा घेतला जातो.

ऊसतोड वाहतूक कामगारांच्या समस्यांबाबत जिल्हाधिकारी स्तरावर दर पंधरवड्यात बैठक घेऊन कामकाजाचा आढावा घेण्याचे निर्देश साखर आयुक्तालयामार्फत दिनांक १६/०५/२०२५ रोजी देण्यात

आले आहेत.

(३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे ऊसतोड कामगारांना द्यावयाच्या सुविधांबाबत माहिती गोळा करण्यासाठी प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांना विहित नमुना पाठवण्यात आला आहे. हंगाम २०२५-२६ करीता साखर कारखान्यांना गाळप परवाना मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज करताना ॲमिकस क्युरी (Amicus Curiae) यांनी दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याच्या सूचना दिनांक २९/०८/२०२५ पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. तसेच साखर कारखान्यांनी कार्यकारी संचालक व जनरल मॅनेजर यांच्या स्तरावर बैठका घेऊन कामगारांच्या सोयी-सुविधांचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भ मराठवाड्यातील औद्योगिक गुंतवणूक वाढविण्याबाबत

**(२) ५०९६ (१४-१२-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या उद्योग विभागासंदर्भात माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये “दावोस” दौऱ्यादरम्यान झालेल्या करारांनुसार आर्थिक गुंतवणूक परिषदेत १९ प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून सदर १९ प्रकल्प हे विदर्भ व मराठवाड्यातील असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑरिक सिटी (Aurangabad Industrial City (AURIC))(छत्रपती संभाजीनगर) यासह मराठवाडा व विदर्भामध्ये जिल्हानिहाय कोणते व किती प्रकल्प राबविण्यात येणार आहेत याची तपशीलवार माहिती आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे राज्यात किती रोजगार निर्मिती होणार आहे तसेच त्यासाठी किती कोटींची नवीन गुंतवणूक येणार आहे व सदर गुंतवणूक वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०१-०७-२०२६) :** (१), (२) व (३) जागतिक आर्थिक परिषद-२०२५ मध्ये सुमारे ६३ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. त्यापैकी मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक २५/०३/२०२५ रोजी आयोजित ११ व्या बैठकीमध्ये एकूण २१ प्रस्ताव उपसमितीच्या विचारार्थ सादर करण्यात आले होते. त्यापैकी २ धोरणात्मक बाबीचे प्रस्ताव वगळता उर्वरीत १९ उद्योग घटकांच्या प्रकल्पांना समितीने विशेष प्रोत्साहने मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर १९ प्रकल्पांपैकी ११ प्रकल्प हे विदर्भात व २ प्रकल्प मराठवाडा क्षेत्रात स्थापित होणार आहेत.

विदर्भातील ११ प्रकल्पांपैकी नागपूर जिल्ह्यात एकूण ७ प्रकल्प, चंद्रपूर जिल्ह्यात १ प्रकल्प व गडचिरोली जिल्ह्यात एकूण ३ प्रकल्प प्रस्तावित आहे. सदर ११ प्रकल्पाव्दारे नागपुर विभागात सुमारे रुपये ३,१६,७१० कोटी गुंतवणूक व सुमारे ७३,९८५ इतका रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.

मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर येथे २ प्रकल्प स्थापित होणार असून त्याव्दारे सुमारे रुपये १४,५२१ कोटी गुंतवणूक व ८,००० रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.
अश्या प्रकारे विदर्भ/ मराठवाड्या क्षेत्रात स्थापित होणाऱ्या १३ प्रकल्पाव्दारे या भागात आगामी कालावधीत रुपये ३,३१,२३१ कोटी इतकी गुंतवणूक व ८१,९२५ इतका रोजगारनिर्मिती होणार आहे.

सदर प्रकल्पामध्ये सोलर पीव्ही मॉड्युल, सेमीकंडक्टर, वेफर्स, अवकाश व संरक्षण साहित्य, लिथियम आयन बॅटरी, केमिकल व पॉलिमर्स उत्पादन प्रकल्पांचा करणाऱ्या सामवेश आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाडा विभागातील अतिवृष्टीग्रस्त विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क व शैक्षणिक शुल्क माफ करण्याबाबत

**(३) ५७२९ (१७-१२-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा विभागात यंदाच्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी व सामान्य कुटुंब मोठ्या आर्थिक संकटात सापडली असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाडा विभागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा फी व शैक्षणिक शुल्क तसेच विविध अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१९-०६-२०२६) :** (१) व (२) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०९/१०/२०२५ व दिनांक १०/१०/२०२५ अन्वये राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे अंशतः बाधित ३१ व पूर्णतः बाधित २५१ असे एकूण २८२ बाधित तालुके घोषित केले आहे. या विभागाचे शासन निर्णय दिनांक १८ जानेवारी,१९९३ व शासन निर्णय,दिनांक २५ ऑक्टोबर,२००४ अन्वये राज्यात आपत्तीमुळे बाधित भागातील राज्यमंडळाच्या इयत्ता १० वी इयत्ता १२ वी च्या परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीची योजना कार्यान्वित आहे. सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामध्ये नियमित प्रविष्ट इ. १० वी व इ. १२ वी च्या पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपूर्ती करण्याची कार्यवाही क्षेत्रिय कार्यालयामार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संच मान्यता व अनुदान आदेशातील पदांच्या तफावतीमुळे शिक्षक अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(४) ६८५६ (१८-०३-२०२६) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शाळा व तुकड्यांना अनुदान देण्यासंदर्भात दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ रोजी शासन आदेश निर्गमित केला असून, त्यानुसार संच मान्यतेनुसार मंजूर शिक्षकांना अनुदान वितरित करणे अपेक्षित असून अनेक शाळांच्या अनुदान आदेशामध्ये संच मान्यतेनुसार मंजूर असलेल्या शिक्षकांची संपूर्ण संख्या दर्शविण्यात आलेली नसल्यामुळे संबंधित शाळांतील अनेक शिक्षक अनुदानापासून वंचित राहत असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संच मान्यतेतील मंजूर पदे व शासन आदेशामध्ये नमूद केलेली शिक्षक पदे यामध्ये तफावत आढळून येत असल्यामुळे पद दुरुस्तीचा प्रश्न निर्माण झाला असून सदर पद तफावती व पद दुरुस्ती प्रक्रियेतील विलंबामुळे अनेक शिक्षक आजही अनुदानापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संच मान्यता व अनुदान आदेशातील शिक्षक पदांमध्ये आवश्यक दुरुस्ती करून संबंधित वंचित शिक्षकांना अनुदानाचा लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-०६-२०२६) :** (१), (२), (३) व (४) दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार, अनुदानास पात्र शिक्षकांची संख्या ही सन २०२२-२३ ची संचमान्यतेनुसार निश्चित करण्यात आली आहे. उक्त शासन निर्णयानुसार ज्या शाळा / तुकड्या, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अनुदानाच्या २० टक्के अथवा ४० टक्के टप्प्यावर सध्या वेतन घेत आहेत, त्याच शाळा / तुकड्या, शिक्षक व शिक्षकेतर पदांना अनुदानाचा वाढीव टप्पा अनुज्ञेय आहे. अनुदानाच्या टप्प्यावर असलेल्या शाळा / तुकड्यांवर कार्यरत शिक्षक अथवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संख्येत कोणत्याही कारणास्तव वाढ होत असली तरी अनुदानाचा वाढीव टप्पा केवळ ज्या पदांना अनुदानाच्या पूर्वीच्या टप्प्यावर अनुदान प्रदान करण्यात आले आहे, त्याच पदांना अनुदानाचा वाढीव टप्पा अनुज्ञेय आहे.

---

## भंडारदरा धरणाच्या शताब्दी वर्षानिमित्त सर्वसमावेशक पर्यटन विकास आराखडा तयार करण्याबाबत

**(५) ७०७१ (१७-०३-२०२६) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उत्तर नगर जिल्ह्याची भाग्यरेषा मानल्या जाणाऱ्या भंडारदरा धरणाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक पर्यटन विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश मा.जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी प्रशासनास दिले असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारदरा धरणाच्या शताब्दी वर्षानिमित्त राबवावयाच्या उपाययोजना व पर्यटन विकास आराखड्याचा आढावा घेण्यासाठी निळवंडे धरण विश्रामगृह येथे संबंधित विभागांची बैठक आयोजित करण्यात आली होती, सदर बैठकीमध्ये भंडारदरा धरणाचे शताब्दी वर्ष कालावधीत धरणाचा शाश्वत व जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ म्हणून विकास करावा, तसेच ब्रिटिशकालीन ऐतिहासिक वास्तूंचे जतन,

वॉटर म्युझियमची उभारणी, स्थानिक नागरिकांना व तरुणांना रोजगारनिर्मिती अशा बाबींचा पर्यटन विकास आराखड्यात समावेश करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प (DRIP) अंतर्गत उपलब्ध निधी व राज्य शासनाच्या विशेष निधीचा वापर करून ही कामे राबविण्यात येणार असून, या महत्त्वाच्या नियोजनासाठी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून जलसंपदा विभाग, वन विभाग व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) यांनी परस्पर समन्वय साधून मास्टर प्लॅन तयार करून त्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जलसंपदा विभागाने भंडारदरा धरण परिसरातील अतिक्रमणे हटवून सुमारे १७ ते १८ हेक्टर जागा उपलब्ध करून दिली असून, या जागेवर विविध पर्यटन प्रकल्प उभारण्यात येणार असल्याने स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे तसेच भंडारदरा धरणाच्या शताब्दी वर्षानिमित्त पर्यटन विकास आराखडा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

भंडारदरा धरणाच्या शताब्दी वर्षानिमित्त करावयाची उपाययोजना व पर्यटन विकास आराखड्याचा आढावा घेण्यासाठी निळवंडे धरण विश्रामगृहात दिनांक २२/१२/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.
(३) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प (DRIP) अंतर्गत फक्त भंडारदरा धरणाच्या मजबुतीकरणाचे काम समाविष्ट असून सदर काम सुरु करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

शताब्दी महोत्सवासाठी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत असून सदर समितीच्या मार्गदर्शन व निर्देशान्वये शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने कामे करण्यात येणार आहेत.
(४) हे, अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागाने धरण परिसरातील अतिक्रमण केलेल्या क्षेत्राची मोजणी भूमी अभिलेख कार्यालयामार्फत केली आहे व हद्दनिश्चितीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर हद्दनिश्चिती प्रक्रिया पूर्ण करुन व अतिक्रमण हटवून १७ ते १८ हेक्टर जागा उपलब्ध करून या जागेवर पर्यटनाचे प्रकल्प उभारण्यात येत असल्याने स्थानिक तरुणांना रोजगार मिळणार आहे.

भंडारदरा धरण शताब्दी वर्षाचा आराखडा तयार करण्याबाबत मा.मंत्री, (जलसंपदा)(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांनी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर कार्यालय यांना पर्यटन तज्ञांची नेमणूक करण्याबाबत निर्देश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत

**(६) ७०९५ (१८-०३-२०२६) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द (जि.भंडारा) येथील प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या संपादीत केलेल्या शेतजमनी, घरे बाधित झाली असून तेथील प्रकल्प बाधितांचे सुमारे ८३२ कोटी रुपयाचे सानुग्रह अनुदान शासनाकडे थकीत असल्याने या राष्ट्रीय सिंचन प्रकल्पास सुमारे ३८ वर्षांचा कालावधी लोटूनही प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या, पुनर्वसन, सिंचन सुविधा व इतर बाबीं संदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेल्या आश्वासनांची अद्याप पूर्तता झालेली नसल्याने, या प्रकल्पग्रस्तांनी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये आंदोलन करण्याचा इशारा दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पबाधितांचे शासनाने मंजूर केलेले हक्काचे अनुदान सर्वसामान्य शेतकरी व जेष्ठ नागरीकांना मिळण्यासाठी समर्थन संस्थेने मा.मंत्री (जलसंपदा), मा.सचिव (जलसंपदा), जिल्हाधिकारी (अमरावती) यांच्याकडे दिनांक ०२ जानेवारी, २०२६ रोजी लेखी पत्राद्वारे निवेदन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या, पुनर्वसन, सिंचन सुविधा व इतर बाबीसंबंधात या प्रलंबित व न्याय्य मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०१-०७-२०२६) :** (१) हे, अंशत: खरे आहे.

गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीमार्फत प्रकल्पग्रस्तांनी दिनांक ३० जानेवारी, २०२६ ला आंदोलन करण्याच्या इशारा दिला होता.

सन २००६ ते २०१३ दरम्यान सरळ खरेदीने संपादित झालेल्या क्षेत्राकरीता रुपये ५.०० लक्ष दराने सानुग्रह अनुदान विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाने मंजूर केले आहे.

गोसिखुर्द प्रकल्पांतर्गत सन २००६ ते २०१३ दरम्यान सरळ खरेदीने संपादित एकूण १५६९.३८ हे. क्षेत्रासाठी रु ७८.४६९ कोटी सानुग्रह अनुदानापैकी, आजतागायत रुपये ४.०४ कोटी वाटप केले आहेत. उर्वरित क्षेत्राचे प्रस्ताव तयार करणे व मंजूरी प्रक्रियेत आहेत.

संघर्ष समितीमार्फत प्रामुख्याने ऐच्छिक पुनर्वसन, भूसंपादन, प्रकल्पग्रस्तांना आरक्षण, वाढीव कुटुंबाचे अनुदान, सानुग्रह अनुदान, नागरी सुविधा इ. मागण्या अंतर्भूत होत्या. तथापि, सदर मागण्या ह्या कायदेशीररित्या देय रकमेव्यतिरिक्त असल्याने याबाबत प्रस्तावांवर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२) होय, हे खरे आहे.

वरीलप्रमाणे मंजूर सानुग्रह अनुदान वाटपाची कार्यवाही सुरु असल्याबाबत संबंधितास कळविलेले आहे.

(३) प्रकल्पग्रस्तांना नोकरीऐवजी रुपये २.९० लाख चे आर्थिक पॅकेज अंतर्गत एकमुस्त अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. जलाशयाजवळील गावांचे ऐच्छिक पुनर्वसन करणेबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शालान्त व उच्च माध्यमिक परीक्षा नियोजन प्रक्रियेत मुख्याध्यापक व शिशकांवर अन्यायकार अटी लादल्याबाबत

**(७) ८३१४ (१८-०३-२०२६) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहावी, बारावी परीक्षांच्या नियोजनात शाळा, मुख्याध्यापक आणि शिक्षकांवर अन्यायकारक अटी लादल्या जात असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ मंडळाने केल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्येवा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परीक्षा प्रक्रियेशी संबंधी तातडीने चर्चा करण्यासाठी शासनाने बैठक घेण्याची मागणी केली असून संबंधित शाळा, मुख्याध्यापक व शिक्षकांवरील कथित अन्यायकारक अटींचा आढावा घेण्यात आला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत तातडीने बैठक घेऊन सदर तक्रारी व मागण्यांबाबत निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच त्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१७-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) शासनाने दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व परीक्षा केंद्रावरील कर्मचारी न बदलणेबाबत संघटनांनी केलेली मागणी, कर्मचारी अदलाबदल केल्यास शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या शैक्षणिक कामकाजात येणारा विस्कळीतपणा तसेच होणारा खर्च या सर्व बाबी लक्षात घेऊन सर्व परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची अदलाबदल न करता ज्या परीक्षा केंद्रावर CCTV कॅमेरे उपलब्ध होणार नाहीत अशा परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्यास मान्यता दिलेली आहे व त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत सर्व विभागीय मंडळांना कळविण्यात आलेले होते. परीक्षा केंद्रावरील CCTV व कर्मचारी अदलाबदल इत्यादीबाबत उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहेत.

या व्यतिरिक्त इ.१० वी व इ.१२ वी परीक्षा नियोजन प्रक्रियेत मुख्याध्यापक व शिक्षकांवर अन्यायकारक अटी लादल्याबाबत सर्व विभागीय मंडळाकडून अहवाल मागविण्यात आला होता.परंतु विभागीय मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार, मंडळाच्या प्रचलित पध्दतीने याही वर्षी इयत्ता १० वी व इसत्ता १२ वी बोर्ड परीक्षा पार पाडण्यात आलेल्या असून शाळा मुख्याध्यापक व शिक्षकांवर कोणत्याही अन्यायकारक अटी लादलेल्या नाहीत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करुन अनुदान देण्याबाबत

**(८) १३१२१ (०६-०४-२०२२) श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी : तारांकित प्रश्न क्रमांक १०८९० ला दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध होण्याकरीता तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याकरीता शाळेमध्ये विविध सोयी-सुविधा व वेतनेतर अनुदान उपलब्ध होणे गरजेचे असून मागील दोन वर्षे सदरहू शाळांना वेतनेतर अनुदान दिले गेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यस, थकित वेतनेतर अनुदान कधीपर्यंत प्राप्त होणार आहे, तसेच वेतनेतर अनुदान ५ व्या वेतन आयोगाप्रमाणे दिले जाते असून ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे दिले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-०६-२०२६) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

राज्यातील अनुदानित / अंशत: अनुदानित शाळांच्या वेतनावरील आर्थिक भार शासनाने उचलला असल्याने वेतनेत्तर बाबींवरील खर्च शाळांनी स्वनिधीतून करणे अभिप्रेत आहे. या शाळांवरील आर्थिक भार कमी व्हावा, या उद्देशाने राज्य शासनाने या शाळांना वेतन अनुदान तसेच वेतनेतर अनुदान अदा करण्याचा निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय दिनांक १९/०१/२०१३ व दिनांक २९/०१/२०१४ अन्वये, दिनांक ०१/०४/२००८ रोजी १०० टक्के योजनेतर (Non Plan) योजनेमध्ये वेतन घेणाऱ्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन अनुदानावर असलेल्या शिक्षण विभागांतर्गत राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक /शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सन २००८ या वर्षी पाचव्या वेतन आयोगानुसार ज्या टप्प्यावर अनुदान अनुज्ञेय होते, त्या टप्प्यावरील देय वेतन अनुदानास गोठवून त्याच्या पाच टक्के वेतनेत्तर अनुदान (४ टक्के वेतनेत्तर अनुदान व १ टक्का इमारत भाडे / देखभाल अनुदान) रुपये २६६.८२ कोटीच्या मर्यादेत दिनांक ०१/०४/२०१३ पासून उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत खाजगी शाळांना देण्यात येणारे वेतनेत्तर अनुदानाचे धोरणाचे पुनर्विलोकन करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वडाळा येथील खारभूमी विकास प्रशासनाच्या भूखंडावर अतिक्रमण झाल्याबाबत

**(९) १४३३९ (२८-०६-२०२२) श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वडाळा मुक्त मार्गावरील दया शंकर मेमोरियल चौकालगत असलेल्या खारभूमी विकास प्रशासनाच्या मोकळया भूखंडाचा वापर एका स्थानिक मंडप डेकोरेटरने मैदानी हॉल म्हणून करुन त्याचे अवास्तव भाडे आकारत असल्याचा गैरप्रकार गत अनेक वर्षापासून घडत असल्याची बाब माहे मे, २०२२

मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मंडप डेकोरेटरने शांतीनगर मधील रहिवाशांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने उभारलेले फिरते शौचालय स्थलांतरीत करुन त्याचा वापर मैदानी हॉल भाड्याने घेणाऱ्या लाभार्थ्यांसाठी केला असून संबंधित विभागाने याची दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मंडप डेकोरेटरने या खारभूमी प्रशासनाच्या अखत्यारित येणाऱ्या मोकळया भूखंडावर अतिक्रमण करुन त्याचा गैरवापर करुन सदर भूखंड हस्तगत केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर मंडप डेकोरेटरने खारभूमी प्रशासनाच्या मोकळया भूखंडाचा गैरवापर केल्याबाबत कारवाई होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (११-०६-२०२६) :** (१), (२), (३), (४) व (५) वडाळा येथील एका नागरिकाने संबंधित जमिनीवर लग्न सभारंभ आयोजित करण्यासाठी सदर जमिनीचा वापर केला होता.त्यामुळे सदरचे कृत्य थांबविण्यासाठी वडाळा पोलीस स्टेशन येथे केंद्र शासनाच्या उपनमक आयुक्त, मुंबई कार्यालयाने दिनांक ०५/११/२०२० रोजी FIR दाखल करण्यात आला आहे. तसेच बृहन्मुंबई महानगर पालिकाचे शौचालय स्थलांतरित करण्याबाबत सुध्दा दिनांक ०५/११/२०२० रोजी FIR दाखल केला आहे. तद्नंतर पुनश्च दिनांक १५/१२/२०२२ रोजी वडाळा पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली आहे. याबाबत पोलीसांकडून चौकशी सुरु आहे.

---

## राज्यात वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करु नयेत यासाठी विविध संघटनांनी संगमनेर, (जि.आहिल्यानगर) येथे आंदोलन केल्याबाबत

**(१०) १५०८३ (३०-११-२०२२) ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करु नयेत यासाठी विविध संघटनांनी संगमनेर, जि.आहिल्यानगर येथील बसेसवर पोस्टर लावून आंदोलन केले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कमी पटसंख्येचे कारण दाखवून शाळा बंद केल्यास वस्तीशाळा तसेच कमी लोकसंख्या असलेल्या हजारो गावांमधील लाखो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार असून एक शिक्षकी शाळांमधून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता १ ली ते ५ वी १ कि.मी. इयत्ता ६वी ते ८वी ३ कि.मी. अंतरावर एक प्राथमिक शाळा आणि त्यापुढील शाळांसाठीही ठरलेल्या कि.मी.पर्यंत सर्वत्र शाळा आहे का नाही याचा शासनाने आढावा घेऊन या आढाव्याप्रमाणे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच अनुदानित, विनाअनुदानित आणि खाजगी शाळांमधील

शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे वेतन आणि इतर सेवा सुविधा देण्यात येतात काय,
(४) असल्यास, राज्यातील जनतेकडून शिक्षण क्षेत्रासाठी घेण्यात येणारा कर शैक्षणिक सुधारणा आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा सुविधांसाठी देण्यात येत नसल्याने आजही हजारो शिक्षक आपल्या हक्काच्या वेतनापासून आणि सेवानिवृत्तीच्या लाभांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात कायआढळून आले, तदनुषंगाने याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२३-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदीनुसार प्रत्येक बालकांच्या निवासापासून १ कि.मी. अंतराच्या आत प्राथमिक शाळा व ३ कि.मी. च्या आत उच्च प्राथमिक शाळा उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, उक्त नमूद अंतराच्या आत प्राथमिक तसेच उच्च प्राथमिक शाळा उपलब्ध नसल्यास अशा ठिकाणच्या विद्यार्थ्यांना नजीकच्या शाळेत जाण्यासाठी वाहतूक भत्ता देण्यात येतो.
(४) हे खरे नाही.
राज्याच्या महसूली जमा व खर्चाबाबतचे विनियोजन विधेयक विधानमंडळाकडून पारीत करण्यात येते. तद्नंतर राज्याच्या एकत्रित निधीमधून, अनुदानाच्या निकषानुसार अनुदानासाठी पात्र ठरलेल्या अनुदनित तसेच अंशत: अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनादी भत्ते दिले जातात.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगोला (जि.सोलापूर) वनपरिक्षेत्रामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(११) १६७७५ (२८-१२-२०२२) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगोला (जि.सोलापूर) वनपरिक्षेत्रामध्ये माहे सप्टेंबर, २०२१ ते ३१ मार्च, २०२२ या कालावधीत वनक्षेत्रपाल व वनपाल यांनी गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदारांकडून कोणताही गैरव्यवहार झाला नसल्याचे जबरदस्तीने लेखी जबाब घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगोला वनपरिक्षेत्रात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी वन विभागाऐवजी त्रयस्त यंत्रणेमार्फत करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर तसेच तक्रारदारांना तक्रार मागे घ्यायला लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (०९-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

श्री.लक्ष्मण श्रीमंत सवळी, रा.मु.करजगी, ता.अक्कलकोट यांचा सांगोला वनपरिक्षेत्रामध्ये गैरव्यवहार केल्याबाबतचा तक्रार अर्ज दिनांक ०४/०५/२०२२ रोजी प्राप्त झाला होता.

(२) हे खरे नाही.

सदर तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार यांना सहा.वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, सोलापूर यांनी सांगोला परिसरातील कामाची सर्व कागदपत्रे दाखविली तसेच तक्रारदार यांनी वनअधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष जागेवर जाऊन क्षेत्रिय कामांची पाहणी केली. सदर कामे मजुर संस्थेकडून व मजुरांकडून करुन घेतल्याची खात्री पटल्यानंतर तक्रारीचे निवारण झाल्याने, श्री.सवळी यांनी स्वखुशीने दिनांक १३/०६/२०२२ रोजी जबाब देवून तक्रार अर्ज मागे घेतला होता. तद्नंतर ५ महिन्यांनी तक्रारदार यांनी दिनांक २४/११/२०२२ रोजीचे पत्रान्वये जबरदस्तीने लेखी जबाब घेतला असल्याने तक्रारअर्ज मागे घेतल्याबाबत अर्ज दिला होता.

श्री.सवळी यांनी केलेल्या तक्रार अर्जाची चौकशी सहायक वनसंरक्षक सामाजिक वनीकरण, सोलापूर यांनी करुन सादर केलेल्या अहवालाचे अनुषंगाने विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, सोलापूर यांनी जागेवर जाऊन केलेल्या शहानिशेत, सांगोला परिक्षेत्रामध्ये सन २०२०-२१ मध्ये करण्यात आलेल्या कामांवर मजूरांच्या नावावर खोटी प्रमाणके, शासकीय निधीचा गैरव्यवहार केलेला नसल्याचे दिसून आले, तसेच कामांची गुणवत्ता चांगली असल्याचे दिसून आले. त्यामुळे श्री.सवळी यांनी केलेल्या तक्रारीत तथ्य नसल्याचा अहवाल वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे यांना दिनांक १६/१२/२०२२ रोजी सादर केला आहे.

(३) या प्रकरणी शासनाने दिनांक २३/०५/२०२३ अन्वये मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), पुणे यांचेमार्फत तपासणी/ चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांनी दिनांक ११/०७/२०२३ अन्वये उपवनसंरक्षक, सोलापूर वनविभाग, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्य समिती गठीत केली होती. सदर समितीने दिनांक २६/०६/२०२४ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार १) तक्रारदार यांनी मोघम तक्रार केली असून, सबळ पुरावे सादर केले नाहीत. याउलट संबंधित वनकर्मचारी यांनी कामाच्या माहितीसह नमूना छायाचित्रे सादर करत तक्रारीतील सर्व मुद्यांचे खंडन केले आहे. २) तक्रारदार यांनी त्यांच्या दिलेल्या पत्रामध्ये सदर तक्रार गैरसमजूतीने /इतरांच्या सांगण्यावरून केली आहे असे म्हणत तक्रारीतील कामाबाबत पूर्ण समाधान झाले आहे व तक्रार निकाली काढावी अशी लेखी विनंती केली असल्याने, श्री.सवळी यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्याची शिफारस केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात तहसिलदार व नायब तहसिलदार संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) २०९८२ (०५-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तहसिलदार व नायब तहसिलदार यांची माहे सप्टेंबर २०२३ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा निहाय किती रिक्त पदे आहेत,
(२) असल्यास, सदर पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याने दैनदिन कामकाजावर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय?
(३) असल्यास, सदरहु रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१७-०३-२०२६) :** (१) राज्यातील तहसिलदार व नायब तहसिलदार यांची माहे सप्टेंबर २०२३ अखेरची रिक्त पदे खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **विभागनिहाय** | **तहसिलदार रिक्त पदे** | **नायब तहसिलदार रिक्त पदे** |
|---|---|---|---|
| १ | छत्रपती संभाजीनगर | १६ | १४६ |
| २ | अमरावती | १२ | १०० |
| ३ | कोकण | ११ | १४६ |
| ४ | पुणे | ६ | ६४ |
| ५ | नाशिक | ८ | ६९ |
| ६ | नागपूर | २० | ८८ |
| | **एकूण** | **७३** | **६१३** |

(२) अंशत: खरे आहे.
रिक्त असलेल्या तहसिलदार व नायब तहसिलदार पदांचा अतिरिक्त कार्यभार सदरहू संवर्गातील अन्य अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात येऊन कामकाज करण्यात येत आहे.
(३) तहसिलदार व नायब तहसिलदार संवर्गात रिक्त पदे ही वेळोवेळी सरळसेवेने तसेच पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे. आजमितीस तहसिलदार संवर्गात २२ पदे व नायब तहसिलदार संवर्गात २९३ इतकी पदे रिक्त असून, सदरहू पदे पदोन्नतीने / सरळसेवेने भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील मोरबे धरणग्रस्त मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(१३) २३१५५ (२२-०७-२०२४) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील मोरबे धरण निर्मीतीला २१ वर्षे होऊनही तेथील धरणग्रस्त मूलभूत सुविधा आणि प्रलंबित मागण्यांपासून वंचित असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृती समिती, मोरबे धरणग्रस्त यांनी वारंवार मूलभूत सुविधा आणि प्रलंबित मागण्यांकरीता शासनाकडे पाठपुरावा करुनही मागण्या पूर्ण न केल्याने शासनाला मार्च, २०२४ वा त्यासुमारास उपोषणाचा इशारा दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी मूलभूत सुविधा व प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) (१८-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांच्या कार्यालयासमोर उपोषण करण्याबाबत मोर्बे धरण प्रकल्पग्रस्त कृती समितीने दिनांक ०८/०१/२०२४ रोजी निवेदन दिले होते. सदर प्रकरणी उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), रायगड यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९/०१/२०२४ रोजी मोर्बे धरण प्रकल्पग्रस्त कृती समितीचे पदाधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांवर कार्यवाही करण्याबाबत उप जिल्हाधिकारी पुनर्वसन, रायगड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिनांक ०६/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्वातंत्र्य पूर्व काळापासून कार्यरत असलेल्या शैक्षणिक संस्थांना १ कोटी रुपयांचा निधी दिला जात असल्याबाबत

**(१४) २३३१२ (२२-०७-२०२४) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १०० वर्ष पूर्ण झालेल्या शाळांना/संस्थांना १ कोटी रुपये निधी दिला जात असल्याचे माहे, मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आता पर्यंत १०० वर्ष पूर्ण झालेल्या किती शाळांना / संस्थाना अशाप्रकारे निधी मिळालेला नाही,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने १०० वर्ष पूर्ण झालेल्या परंतु अद्याप निधी न मिळालेल्या शाळांना/संस्थांना सदर अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे. तसेच याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून कार्यरत असलेल्या व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करुन शाळेची गुणवत्ता राखून ठेवणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून अन्य माध्यमाच्या शाळांचा सर्वांगीण विकास

होण्याच्या दृष्टीने विहित निकष, ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पात्र ठरलेल्या १०० शाळांना प्रत्येकी रुपये १० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यास दिनांक ०३ मार्च, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. तथापि, सदरचा प्रस्ताव व शासन निर्णय वित्त विभागाची मान्यता नसल्याने दिनांक ०५ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मरीन लाईन्स, मुंबई येथील विल्सन कॉलेजच्या जिमखान्याचा भूखंड संस्थेला भाडेतत्त्वावर दिल्याबाबत

**(१५) २३५१२ (२२-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरीन लाईन्स (मुंबई) येथील विल्सन कॉलेजच्या विल्सन जिमखान्याचा लाखो चौरस फुटाचा भूखंड एका संस्थेला जिमखान्यासाठी ३० वर्षाच्या भाडेतत्त्वावर दिला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे मुंबईतील हे महत्त्वाचे मैदान क्लबमध्ये रूपांतरित होणार असल्याने विल्सन कॉलेज मधील आजी-माजी विद्यार्थी व काही प्राध्यापकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत सदर निर्णयाचा पुनर्विचार करून विद्यार्थ्यांसाठी पूर्वीप्रमाणे हे मैदान उपलब्ध करण्याची मागणी शासनाकडे केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने लाखो चौरस फुटाचा भूखंड एका संस्थेला जिमखान्यासाठी ३० वर्षाच्या भाडेतत्त्वावर दिलेल्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याबाबत कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१७-०६-२०२६) :** (१),(२),(३), व (४)

भूलेश्वर महसूल विभागातील भू.क्र.४७१, क्षेत्र १०२५७.८८ चौ.मी. विल्सन कॉलेज जिमखाना या मिळकतीबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने शर्तभंगाबाबत सुनावणी घेवून सदरची मिळकत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दिनांक ०५/१२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये शासनजमा केली.

तद्नंतर महसूल व वन विभाग शासन ज्ञापन दिनांक १६/०३/२०२४ अन्वये ही शासकीय मिळकत जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन या संस्थेला जिमखाना या प्रयोजनासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने वाटप करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

विषयाधीन मिळकतीबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये Writ Petition No.४९२२ of २०२४ व Writ Petition No.६१५० of २०२४ व Writ Petition (L) No.२३५७९ of २०२४ या पिटीशन दाखल असून सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

## कल्याण येथील वडवली कोळीवाड्यातील शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(१६) २३५३९ (१२-०८-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण येथील वडवली कोळीवाड्यातील शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य न झाल्याने उपोषण करणार असल्याचे निवेदन तहसिलदार, कल्याण यांना देण्यात येऊनही याबाबत कोणतीही कार्यवाही न झाल्याने शेतकऱ्यांनी पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कल्याण येथील वडवली कोळीवाड्यातील शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१९-०६-२०२६) :** (१), (२) व (३) प्रस्तुत प्रकरणी वडवली कोळीवाडा शेतकरी संघर्ष समिती, वडवली कोळीवाडा, आंबिवली (प.) कल्याण यांनी मौजे वडवली कोळीवाडा येथील शेतकऱ्यांनी मे.निर्मल लाईफ स्टाईल या विकासकाला करार करून दिलेल्या जमिनीवर विकासकाने कोणतीही विकासकामे न करता शेतकऱ्यांच्या जमिनी हडप केल्याबद्दल संपूर्ण प्रकरणाचा तपास करण्याबाबतचे निवेदन दिनांक २३/०८/२०२४ रोजी उपविभागीय अधिकारी, कल्याण यांना दिले होते.

प्रकरणी नमुद करण्यात येते की, मे.निर्मल लाईफस्टाईल कल्याण प्रा.लि.तर्फे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर श्री.धर्मेश सरदारमल जैन यांनी सह दुय्यम निबंधक कल्याण यांचेकडे भूविकास करार व कुळमुखत्यारपत्राची नोंदणी करुन त्याबाबतची नोंद ७/१२ सदरी इतर हक्कात घेण्याकरीता तत्कालीन तलाठी सजा आंबिवली यांचेकडे अर्ज केला होता.त्यानुषंगाने संबंधित तत्कालिन तलाठी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये सर्व हितसंबधीतांस महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम आणि नोंदवह्या (तयार करणे) व सुस्थितीत ठेवणे नियम १९७१ अन्वये विहीत कार्यपध्दतीचा अवंलब करून नोटीसा बजावून मौजे-वडवली, ता.कल्याण येथील १) सर्व्हे नं.६८/८ व इतर २) सर्व्हे नं. ७०/१, ३) सर्व्हे नं. ९/२४/अ, ४) सर्व्हे नं.१/३ व इतर १४, ५) सर्व्हे नं.२०/१४ व इतर आणि ६) सर्व्हे नं.१९/३ व इतर या सर्व्हे नंबरच्या ७/१२ च्या इतर हक्क सदरी अनुक्रमे फेरफार क्रमांक ११८८, दिनांक २२/०२/२०१२, फेरफार क्र. ११८९, दिनांक २२/०२/२०१२, फेरफार क्र. ११९०, दिनांक १७/०४/२०१२, फेरफार क्र. ११९१, दिनांक १७/०४/२०१२, फेरफार क्र. ११९२, दिनांक १७/०४/२०१२ व फेरफार क्र. ११९३, दिनांक १७/०४/२०१२ अन्वये विकसन कराराचा बोजा दाखल करण्यात आला आहे. तद्नंतर उक्त फेरफार मंजूर करण्यात आले आहेत.

तसेच प्रकरणी दुय्यम निबंधक कल्याण-२ यांचेकडील नोंदणीकृत भूविकास करार व नोंदणीकृत कुळमुखत्यारपत्र यांच्या तपासणीअंती सदर भूविकास करार हे नोंदणी अधिनियम १९०८ मधील तरतुदीप्रमाणे नोंदणीकृत असल्यामुळे सदर दस्ताची नोंद गावदप्तरी घेणे क्रमप्राप्त असल्याकारणाने तत्कालिन संबंधित ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी उपरोक्त फेरफार नोंदी मंजूर केल्या आहेत. त्यानुषंगाने उपरोक्त सर्व्हे नंबर येथील जमिनीच्या इतर हक्क सदरी भूविकास कराराचा बोजा दाखल

केला आहे. तसेच उपरोक्त गा.न.नं.७/१२ सदरी आजरोजी संबंधित जमीन धारक (जमीन मालक) यांची नांवे दाखल असून मालकी हक्कामध्ये बदल झालेला नाही.

---

## भिसेगाव (ता.कर्जत, जि.रायगड) येथील आदिवासी वाडीतील ग्रामस्थांना शासनाच्या एकही योजनेचा लाभ मिळाला नसल्याबाबत

**(१७) २३५६५ (१८-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिसेगावातील (ता.कर्जत, जि.रायगड) आदिवासी वाडी सुमारे ४० वर्षांपासून अस्तित्वात असूनही शासनाची एकही योजना येथील नागरिकांपर्यंत पोहोचली नसल्याची तसेच येथील नागरिकांनी हक्काचे घर मिळावे यासाठी उपविभागीय अधिकारी व नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन दिल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात व त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आदिवासी वाडीवरील नागरिकांपर्यंत आदिवासीसाठींच्या योजना व त्याचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके (२८-०२-२०२६) :** (१) व (२) शासन निर्णय दिनांक ११/०१/२०२४ नुसार शबरी आदिवासी घरकुल योजना शहरी भागात राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. भिसेगाव आदिवासी वाडी ही कर्जत नगरपरिषद क्षेत्रात असून शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत कर्जत नगर परिषद क्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांना घरकुल देण्यासंदर्भात सदर शासन निर्णयातील तरतुदी नुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. शासनाच्या विविध विभागाच्या संबंधित यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील वाडी-वस्ती मध्ये विविध योजना राबविण्यात येत असून आदिवासी विकास विभागामार्फत तसेच जिल्हा वार्षिक आदिवासी घटकांतर्गत विविध योजनांचे लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात वन्य प्राण्यांच्या धडकेने वाहन चालकाचा मृत्यू झाल्यास अनुदान देण्याबाबत

**(१८) २३७३७ (०८-०८-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन्य प्राण्यांच्या धडकेने वन विभागातून जाणाऱ्या वाहनावरील वाहन चालकाचा मृत्यू झाल्यास वनविभागाकडून देण्यात येणारे अनुदान शासनाने बंद केल्याचे माहे एप्रिल २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वन विभागातून जाणारे हजारो किलो मीटरचे रस्ते असून वाहनचालकाची कोणतीही चूक नसताना केवळ वन्य प्राण्याच्या धडकेने होणाऱ्या अपघातासाठी सदर अनुदान पुन्हा सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२२-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

राज्यात वन्य प्राण्यांच्या धडकेने वन विभागातुन जाणाऱ्या वाहनावरील चालकाचा मृत्यू झाल्यास नुकसान भरपाई देण्याबाबत शासन निर्णय अस्तित्वात नाही. परंतु खालीलप्रमाणे तरतुद आहे.

महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा, नुकसान भरपाई याकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ अधिसूचना दिनांक ३०/०१/२०२४ रोजी निर्गमीत केली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कापूस व सोयाबीन मूल्यसाखळी योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) २४३८७ (०८-०८-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कापूस व सोयाबीन मूल्यसाखळी योजनेत शेतकऱ्यांच्या नावाखाली १४१ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जून २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषी आढळून आलेल्या संबंधित दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दत्तात्रय भरणे (१०-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

कापूस सोयाबीन पिकांची उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ साठी नॅनो युरिया, नॅनो डिएपी, मेटाल्डीहाईड, बॅटरी संचलित फवारणी पंप व कापूस साठवणूक बॅग या निविष्ठा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यासाठी या निविष्ठांचे दर हे महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांच्या स्तरावर विहित निविदा प्रक्रिया राबवून निश्चित करण्यात आले होते. तसेच, कापूस साठवणूक बॅगबाबत महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांच्या स्तरावरुन दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही

सदर योजनेच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधी व इतर यांचेकडून विविध प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मा.राज्यमंत्री (कृषी) यांनी अ.मु.स.(कृषी) यांचेसोबत बैठक घेऊन या प्रकरणी अहवाल सादर करण्याचे सूचित केले होते. त्यानुसार अ.मु.स.(कृषी) यांच्या स्तरावर चौकशी करण्यात आली असून, त्याचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रेल्वेमार्ग चौपदरीकरण तसेच मुंबई - अहमदाबाद द्रुतगती मार्ग, डी.एफ.सी.सी. व बुलेट ट्रेन इत्यादी प्रकल्पाच्या भूसंपादनाच्या प्रक्रियेत करोडो रुपयांचा अपहार झाल्याबाबत

**(२०) २४४०३ () श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरार-डहाणू (जि.पालघर) रेल्वेमार्ग चौपदरीकरण, मुंबई - अहमदाबाद द्रुतगती मार्ग, डी.एफ.सी.सी. व बुलेट ट्रेन आदि प्रकल्पाच्या भूसंपादनाच्या प्रक्रियेत विद्यमान भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पालघर यांनी कोटयवधी रक्कमेचा अपहार केला असल्याची बाब दिनांक १६ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाधित बांधकामावर सहाय्यक अभियंता, उपविभागीय अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी ८० टक्के बांधकामाच्या पुनर्मोजणीमध्ये मूल्यांकन वाढवून दिल्याबाबत अपर जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने गठित केलेल्या समितीने अपूर्ण अहवाल सादर केला आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर प्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१६-०३-२०२६) :** (१), (२) व (३) पालघर व ठाणे जिल्ह्यातील बुलेट ट्रेन, मुंबई-अहमदाबाद द्रुत गती मार्ग, दिल्ली फ्रिट कॉरिडॉर (DFCCL) प्रकल्पाच्या भूसंपादनातील अनियमितता अथवा गैरव्यवहाराबाबत शासन परिपत्रक क्र. विपता-२०२२/ प्र.क्र. १५५/अ-२ दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ अन्वये विभागीय आयुक्त कोकण यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली.

सदर समितीने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला असून समितीचे निष्कर्ष व शिफारशीनुसार कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.